# प्रकरण पाचवे

# माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.

# प्रकरण पाचवे.
# माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.

## अनुक्रमणिका.


५.१ प्रस्तावना.

५.२ प्रश्नावलीच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थ निर्वचन.

अ) प्राचार्यांची वैयक्तिक माहिती.
ब) अध्यापक विद्यालयांच्या व्यवस्थापना विषयी माहिती.
क) भौतिक सुविधांविषयी माहिती.
ड) शिक्षक प्रशासनासंबंधी माहिती.
इ) शिक्षकेतर कर्मचा-यांविषयी माहिती.
ई) विद्यार्थ्यांच्या प्रशासनाविषयी माहिती.
उ) कार्यालयीन कामकाज व दप्तर यांची माहिती.
ऊ) आर्थिक प्रशासनाविषयी माहिती.

५.३ मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन
अ) शिक्षकांच्या मुलाखतीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन.
१. शिक्षकांच्या प्रशासनाविषयी माहिती.
२. विद्यार्थ्यांच्या प्रशासनाविषयी माहिती.
३. भौतिक सुविधांविषयी माहिती.
४. आर्थिक बाबींविषयीची माहिती.

ब) शिक्षणाधिकारी व उपशिक्षण अधिका-यांच्या मुलाखतीच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन.
१. सर्वसामान्य माहिती.
२. विद्यालयांच्या प्रशासनाविषयी माहिती.
३. प्रशासनात सुचविलेल्या सुधारणा.

५.४ भेटीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन.

१. भौतिक सुविधांसंबंधी माहिती.

२. शिक्षकांसंबंधी माहिती.

५.५ समारोप.

# प्रकरण पाचवे.

## माहितीचे पृथ: करण व अर्थनिर्वचन.

### ५.१ प्रस्तावना.

प्रकरण चार मध्ये संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी माहिती मिळविण्यासाठी कोणती पद्धत वापरली व माहिती कशी मिळवली हे दिले आहे.

"सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास" हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. प्रश्नावली, मुलाखती, भेटी, चर्चा यांचा उपयोग करून मिळवलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन संशोधकाने या प्रकरणात केले आहे.

### ५.२ प्रश्नावलीच्या द्वारे मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.

संशोधकाने संशोधनाची उद्दिष्टे लक्षात घेऊन प्रश्नावली तयार केली. ही प्रश्नावली परिशिष्ट २ मध्ये दिली आहे.

**अ. प्राचार्यांची वैयक्तिक माहिती :-**

या विभागामध्ये प्रश्न क्र.१ पासून ३ पर्यत एकूण ३ प्रश्न विचारण्यात आलेले होते. या विभागातील १ला प्रश्न प्राचार्यांच्या व अध्यापक विद्यालयांच्या नावाविषयी होता. प्रतिसादक प्राचार्यांच्या नावाची यादी परिशिष्ट क्र.३ मध्ये व अध्यापक विद्यालयांच्या नावाची यादी परिशिष्ट क्र.१ मध्ये दिली आहे.

प्रतिसादकांकडून माहिती मिळविताना प्रतिसादक जर जास्त शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता धारण करणारे असतील तर त्यांच्याकडून मिळणारी माहिती ही अधिक महत्वाची असते. सोलापूर जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य योग्य त्या शैक्षणिक पात्रतेचे आहेत का? हे पाहण्यासाठी प्रश्न २ रा प्रतिसादकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रते संबंधी होता. प्रतिसादक प्राचार्यांकडून प्राप्त झालेली माहिती कोष्टक क्र.५.१ मध्ये देण्यात आली आहे.